महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता दुरुस्ती प्रस्तावांबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१४/प्र.क्र.२०४/एसएम-२**

**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,**

**मंत्रालय, मुंबई -४०० ०३२**

दिनांकः **२५ जून,२०१४**

वाचा

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. स्वयंअ-२०१३/(८५/१३)/माशि-१, दिनांक १५ जून, २०१३

२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. स्वयंअ-२०१३/(८५/१३)(II) /माशि-१, दिनांक ५ ऑक्टोबर, २०१३

**प्रस्तावना**

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियन, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता संदर्भाधीन शासन निर्णयान्वये ३२४७ संस्थांच्या शाळा पात्र म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. तथापि, सदर शासन निर्णयामध्ये पात्र झालेल्या प्रस्तावापैकी काही प्रस्तावांच्या शाळांच्या बाबतीत त्यांनी मूळ प्रस्तावामध्ये मागणी केल्यानुसार अभ्यासक्रम, शाळांचे माध्यम, प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक वा प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळा मंजूर झाल्या नव्हत्या. तसेच, अपात्र झालेल्या प्रस्तावांच्या बाबतीत संबंधित संस्थांनी आपल्या निवेदनाव्दारे सदर बाबी शासनाच्या निदर्शनास आणल्या आहेत. संबंधित संस्थांची निवेदने तसेच, क्षेत्रीय कार्यालयाचे अभिप्राय/अहवालाच्या अनुषंगाने दुरुस्त्या करण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय**

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी

२०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता सोबत जोडलेल्या सहपत्रानुसार प्रस्तावांमध्ये दुरुस्ती /सुधारणा करण्यास, संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक १५ जून, २०१३ व ५ ऑक्टोबर, २०१३ मधील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून, तसेच खालील नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून याव्दारे शासन मान्यता देण्यात येत आहे:-

१) शाळेने प्रस्तावित केलेली जागा/जमीन नियमानुसार किमान २ एकर सलग/अथवा शाळेसाठी योग्य असल्याची संबंधित शिक्षणाधिकारी यांनी खात्री करावी. सदर जागा/जमीन नियमानुसार आढळून न आल्यास संस्थेची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

२) दाननिधी (कायम मुदतठेव) पावती संस्थेच्या नावावर शाळा मान्यतेचा प्रस्ताव दाखल केल्याच्या दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरिता असणे आवश्यक आहे. मुदतीनंतर त्याचे नूतनीकरण करण्याबाबत संबंधित, संस्थेची /शाळा व्यवस्थापनाची व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांची जबाबदारी राहील. अशी कायम मुदतठेवीची मूळ पावती संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांचेकडे तारण म्हणून ठेवावी.

२. सदर आदेश सर्व व्यवस्थापन/संस्था यांना १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित सर्व शिक्षण उपसंचालक यांची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०६२६११२६२६५५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra
Shankarrao
Pawar

(राजेंद्र पवार)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

२. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त

३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.

५. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.

६. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

७. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

८. विभागांतर्गत सर्व संचालक.

९. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.

१०. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)

११. सर्व शिक्षण निरीक्षक (पश्चिम / उत्तर / दक्षिण) बृहन्मुंबई.

१२. संबंधित प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपालिका

**प्रत माहितीसाठी अग्रेषित :-**

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.

२. मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.

३. मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक

४. सर्व सहसचिव / उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय, मुंबई-३२

५. निवडनस्ती (एसएम-२).

प्रपत्र - अ

शाळेचा प्रकार बदल

(एकूण-२७ प्रस्ताव)

शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एसएफएस-१०१४/प्र.क्र.२०४/एसएम-२, दि. २५ जून, २०१४ चे सहपत्र

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत सन २०१३-१४ साठी पात्र प्रस्तावांच्या दुरुस्तीबाबत

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव | शाळेचे नाव/ प्रस्तावित ठिकाण | संस्थेचा मूळ प्रस्ताव | दि.१५ जून, २०१३ व ५ ऑक्टोबर २०१३ नुसार देण्यात आलेली परवानगी | शासनाने मान्य केलेली दुरुस्ती | पात्र/अपात्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ८ | ९ |
| १ | ठाणे | जमनाबेन हिराचंद अंबानी फाउंडेशन, नरीमन पॉईंट, मुंबई | रिलायन्स पब्लिक स्कूल, कोपरखैरणे, जि. ठाणे | प्राथमिक ते उच्च माध्यमिक माध्यम - इंग्रजी | प्राथमिक ते माध्यमिक | प्राथमिक ते उच्च माध्यमिक असा बदल | पात्र |
| २ | रायगड | एच.एम.एच.एज्युकेशन, ता. कर्जत, जि. रायगड | हाजी लियाकत इंग्लिश स्कूल, नेरुळ,ता.कर्जत, जि. रायगड | प्राथमिक ते उच्च माध्यमिक माध्यम - इंग्रजी | प्राथमिक | प्राथमिक ते उच्च प्राथमिक (नवीन) असा बदल | पात्र |
| ३ | पुणे | एस.व्ही चॅरिटेबल फाऊंडेशन, गणेशनगर, तळवडे रोड, पुणे | सरस्वती विश्व विद्यालय नॅशनल स्कुल, गणेशनगर, तळवडे रोड, पुणे | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | प्राथमिक | प्राथमिक ते उच्च माध्यमिक माध्यम - इंग्रजी असा बदल | पात्र |
| ४ | पुणे | मावळ शिक्षण प्रतिष्ठान तळेगाव दाभाडे ता. मावळ जि.पुणे | प्रतिक विद्यानिकेत निगडे ता. मावळ जि.पुणे | उच्च प्राथमिक | प्राथमिक | उच्च प्राथमिक माध्यम - इंग्रजी असा बदल | पात्र |
| ५ | अहमदनगर | पमकिन हाऊस फॉर चिल्ड्रन बंडगार्डन रोड पुणे | डिवाईन ग्रेस स्कुल, दौंड रोड अ. नगर ता. जि. अ. नगर | प्राथमिक ते उच्च प्राथमिक | प्राथमिक | प्राथमिक ते उच्च प्राथमिक माध्यम - इंग्रजी असा बदल | पात्र |
| ६ | पुणे | श्री ज्ञानयोग विद्या प्रतिष्ठान, वडगाव बुद्रूक ता. हवेली जि.पुणे | कै. मोहनराव भिडे संस्कार गुरुकुल स्कुल, भिडे बाग, बुद्रूक ता. हवेली जि.पुणे | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | प्राथमिक | प्राथमिक ते उच्च माध्यमिक माध्यम - इंग्रजी असा बदल | पात्र |
| ७ | पुणे | माऊंट झायन एज्युकेशन ट्रस्ट , हडपसर | अंबडट लाइफ स्कुल, महमदवाडी, हडपसर | प्राथमिक ते माध्यमिक माध्यम - इंग्रजी | प्राथमिक माध्यम- इंग्रजी | प्राथमिक ते माध्यमिक माध्यम - इंग्रजी असा बदल | पात्र |
| ८ | सोलापूर | श्री. कृष्णा अर्जुना शैक्षणिक संस्था, शाहुपुरी, कोल्हापुर | श्री. गुरुकुल विद्यापीठ राजुरी ता. सांगोला जि. सोलापूर | उच्च प्राथमिक (दर्जावाढ) माध्यम- मराठी (सेमी इंग्रजी) | प्राथमिक माध्यम- मराठी | उच्च प्राथमिक (दर्जावाढ) माध्यम- मराठी (सेमी इंग्रजी) असा बदल | पात्र |
| ९ | सोलापूर | जयमल्हार बहुद्देशिय शैक्षणिक सामाजिक कला क्रीडा मंडळ, करांडेवाडी- बुध्देहाळ ता. सांगोला जि. सोलापूर | गुरुकुल उच्च प्राथमिक विद्यालय बुध्देहाळ ता. सांगोला जि. सोलापूर | उच्च प्राथमिक माध्यम- मराठी | प्राथमिक माध्यम- मराठी | उच्च प्राथमिक माध्यम- मराठी असा बदल | पात्र |
| १० | लातूर | मातोश्री जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ, सय्यदपूर ता. अहमदपूर जि. लातूर | दिवाकररावजी रावते प्राथमिक ते उच्च माध्यमिक विद्यालय, सय्यदपूर ता. अहमदपूर जि. लातूर | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | प्राथमिक | प्राथमिक ते उच्च माध्यमिक असा बदल | पात्र |
| ११ | लातूर | शेख मिरा एज्युकेशन अॅड वेलफेअर सोसायटी उदगीर | मास्टर माईंड प्राथ., माध्यमिक, उच्च माध्यमिक सीबीएसई इंग्लिश स्कुल डंमरोड मदलापूर ता. उदगीर जि.लातूर | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | प्राथमिक | प्राथमिक ते उच्च माध्यमिक असा बदल | पात्र |
| १२ | लातूर | जीवनज्योत बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, चाकूर जि. लातूर | राजीव गांधी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, चाकूर, ता. चाकूर जि. लातूर | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | प्राथमिक | प्राथमिक ते उच्च माध्यमिक असा बदल | पात्र |